सौ. सुरेखा जोशी
२०१, पितृछाया, प्लॉट नं. ८३,
सखाराम कीर मार्ग, माहीम, मुंबई - १६
(दूरभाष : ९८६९६११८२८)

**संस्कृतभाषासंस्था**

दिनांक : २०/४/२०११

**विषय : प्राथमिक शालान्त संस्कृतभाषा-स्पर्धा-परीक्षा, २०१२**

कोणत्याही माध्यमाच्या शाळेत पाचवी, सहावी व सातवी इयत्तेमध्ये शिकत असलेल्या मुलां-मुलींसाठी **रविवार, दिनांक ८ जानेवारी २०१२** या दिवशी संस्कृतभाषासंस्था, **पुणे शाखा** यांच्यातर्फे **संस्कृतभाषा-स्पर्धा-परीक्षा** घेण्यात येईल.

बालमनावर संस्कृतभाषा संस्कार व्हावेत यासाठी इयत्ता पहिली ते चौथी या प्राथमिक इयत्तांमध्ये संस्कृत गद्य-पद्य पाठ ऐकून, बोलून घेता यावेत या हेतूने संस्कृतवाचनमाला भाग एक ते चार (भाग १-४) ही संस्कृतभाषेतील सुबोध, सचित्र, रमणीय पुस्तके संस्कृतभाषासंस्थेने प्रकाशित केली आहेत. ही चार पुस्तके व "संस्कृतभाषादर्पण:" अशी पाच पुस्तके या परीक्षेसाठी विहित केली आहेत. संस्कृतवाचनमाला भाग १ ते ४ च्या अभ्यासासाठी ध्वनिफिती उपलब्ध असून प्रत्येक भागाचे मूल्य रू. ३५/- एवढे आहे. चारही भागांच्या ध्वनिफितींचा संच एकदम खरेदी केल्यास रु. १३०/- या सवलतमूल्यात मिळेल. **याशिवाय संस्कृतवाचनमाला भाग १ ते ४ मधील फक्त सुभाषिते, प्रार्थना व बालगीते यांचीही स्वतंत्र ध्वनिफीत रु. ४०/- व सीडी रु. ६०/-ला उपलब्ध आहे.**

**या परीक्षेसाठी प्रत्येकी १०० गुणांचे दोन लेखी पेपर व ५० गुणांची तोंडी परीक्षा अनिवार्य आहे.** ही परीक्षा **उत्तीर्ण** होणाऱ्या प्रत्येकाला **प्रमाणपत्र** दिले जाईल. **प्रत्येक गटामध्ये गुणानुक्रमे पहिल्या तीन विद्यार्थ्यांना** अनुक्रमे रू. १०००/-, रू. ७५०/- व रू. ५००/- अशी पारितोषिके दिली जातील. **कोणत्याही एका लेखी पेपरमध्ये** १०० पैकी १०० गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्याला तसेच **सर्व विद्यार्थ्यांमध्ये प्रथम क्रमांक** मिळविणाऱ्या विद्यार्थ्याला संस्थेतर्फे विशेष पारितोषिक देण्यात येईल. इयत्ता पाचवी, सहावी व सातवी गटांमध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविण्यासाठी पात्रता पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आली आहे.

| | | |
|---|---|---|
| इयत्ता ५ वी | — | ८५% प्रथम क्रमांक |
| | | ८०% द्वितीय व तृतीय क्रमांक |
| इयत्ता ६ वी<br>इयत्ता ७ वी | — | ९०% प्रथम क्रमांक<br>८५% द्वितीय व तृतीय क्रमांक |

परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी किमान ४०% गुण प्राप्त करणे आवश्यक आहे.
वरील पारितोषिकांखेरीज **उत्तेजनार्थ** पारितोषिकेही देण्यात येतील.

या परीक्षेच्या अभ्यासकाला काही प्रमाणात संस्कृतभाषेत संभाषण, वाचन, लेखन-सामर्थ्य येईल. तसेच माध्यमिक शाळेतील संस्कृत पाठ्यपुस्तकांचा अभ्यास स्वबळावरही करता येईल. संस्कृतभाषेबद्दलचे गैरसमज व भीती दूर होऊन त्या भाषेबद्दल आपुलकी व भक्ती निर्माण होईल. संस्कृतभाषेचा हा अभ्यास मराठी व हिन्दी भाषांनाही पोषक ठरेल.

खाजगीरीत्या तसेच शाळांनाही या परीक्षेसाठी अभ्यासवर्ग चालविता येतील. गेल्या तेरा-चौदा वर्षांत काही पालक आपल्या पाल्यांना घरी स्वत: शिकवून परीक्षेसाठी बसवत आहेत.

परीक्षेसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची सूची संबंधित शाळाप्रमुख अथवा अध्ययन-वर्ग चालविणारे शिक्षक/पालक यांनी परीक्षा-शुल्क रु. ५०/- सहित दिनांक २० ऑक्टोबर, २०११ (२०/१०/२०११) पर्यन्त पुढीलपैकी एका पत्त्यावर पाठवावी. ही सूची ५वी, ६वी व ७वी या गटांसाठी स्वतंत्र असावी व त्यामध्ये विद्यार्थ्याचे पूर्ण नांव, शाळेचे नांव, इयत्ता हा तपशील असणे अनिवार्य आहे. सूची इंग्रजी भाषेमध्ये नसावी.

**श्री. ग.वा. करंदीकर**
**संस्थापक, संस्कृतभाषासंस्था.**

**सौ. सुरेखा जोशी**
**अध्यक्षा, संस्कृतभाषासंस्था.**

**१) सौ. विनोदिनी जोशी** - परीक्षा प्रमुख
पुणे
(दूरभाष क्र. ०२०-२४२६५०००)

**२) सौ. अमिता बोंद्रे**
पुणे
(दूरभाष क्र. ०२०-२५३८०७१३)

**३) श्री. प्रसाद कोचरेकर**
मुंबई
(भ्रमणध्वनी क्र. : ९८१९२८६००४)

**४) सौ. मनिषा मुळे**
"सुगम", अमित बॅन्क कॉलनी
रासने नगर, सावेडी, अहमदनगर - ४१४००१
(दूरभाष क्र.: ०२४१-२४१५६४२)

**५) श्री. वा. ह. जहागिरदार**
५-३, लोटस् अपार्टमेन्ट,
१५९, रेल्वे लाईन, सोनामाता हायस्कूल जवळ,
सोलापूर - ४१३००१ (दूरभाष क्र. ०२१७-२३१३७८३)

**विशेष सूचना : ही स्पर्धा परीक्षा प्रामुख्याने ५वी, ६वी, ७वी मध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी आहे. या परीक्षेस प्रौढ व इतरही इयत्तातील विद्यार्थी बसू शकतील व इतरांना शिकवून या भाषेचा सहज, सुलभ प्रसारही करु शकतील.**

ठिकठिकाणच्या अध्यापन व्यवस्थेसाठी पुढील ठिकाणी संपर्क साधावा.

| | | |
|---|---|---|
| १) अंबरनाथ | - सौ. नन्दिनी देव | ०२५१-२६००१२४ |
| २) ठाणे | - सौ. निवेदिता रिसबूड | २५४०५७५८ |
| | - सौ. झेलम इमानदार | २५३२६९४४ |
| ३) दादर | - श्रीमती उज्ज्वला पवार | २४४६०२२४ |
| ४) नेरुळ | - सौ. विद्या बुजोणे | २७७२६१८० |
| ५) मुंबई सेंट्रल | - सौ. स्वाती सहस्त्रबुध्दे | २३०२२३९१ |
| ६) विलेपार्ले | - श्री. श्रीधर अय्यर | २४०२३५९१ |
| ७) बोरीवली | - कु. नम्रता राणे | ९८६९१६९९३४ |
| | सौ. रश्मी धुपकर | २८५४८७८६ |
| ८) पुणे | - सौ. शीतल गोखले | ०२०-२४४८२७१२ |
| | सौ. जयश्री गोडसे | ०२०-२४४७२०६७ |
| ९) अहमदनगर | - सौ.मनीषा मुळे | ०२४१-२४१५६४२ |
| १० ) सोलापूर | - श्री. वा.ह. जहागिरदार | ०२१७-२३१३७८३ |

*गेल्या २ वर्षापासून ह्या परिक्षेची जबाबदारी पुणे शाखेकडे सोपविण्यात आलेली आहे याची संबंधितांनी नोंद घ्यावी.*